# प्रकरण तिसरे

(३) वारणा बझारची माहिती.

३.१ वारणा बझारचे सभासद संख्या -

३.२ वारणा बझारचे भाग भांडवल -

३.३ वारणा बझारची एकूण विक्री -

३.४ वारणा बझारचे शाखा विस्तार

३:१ वारणा बझारचे सभासद संख्या --

तक्ता क्रमांक ३.१

वारणा बझारचे २ एप्रिल १९७८ ते १९८८ अखेर सभासद संख्या


| | वर्ष | व्यक्ती सभासद संख्या | | | वारणा सहकारी साखर कारखाना | इतर सहकारी संस्था | इतर संस्था | सरकार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण | | | | | एकूण |
| १ | १९७८ | ११०४ | २०० | १३०४ | १ | ४ | ३ | १ | १३१३ |
| २ | १९७९-८० | ११७६ | २९५ | १४७१ | १ | ४ | ३ | १ | १४८० |
| ३ | १९८०-८१ | १२१५ | ४०७ | १६२२ | १ | ४ | ३ | १ | १६३१ |
| ४ | १९८१-८२ | १२७९ | ५७७ | १८५६ | १ | ४ | ३ | १ | १८६५ |
| ५ | १९८२-८३ | १३२२ | १४९८ | २८२० | १ | ४ | ३ | १ | २८२९ |
| ६ | १९८३-८४ | १३३२ | १६२० | २९५२ | १ | ४ | ३ | १ | २९६१ |
| ७ | १९८४-८५ | १३३८ | १७२० | ३०६८ | १ | ४ | ३ | १ | ३०७७ |
| ८ | १९८५-८६ | १३४५ | १९८९ | ३३३४ | १ | ४ | ३ | १ | ३३४३ |
| ९ | १९८६-८७ | १३५७ | २०५० | ३४०७ | १ | ४ | ३ | १ | ३४१६ |
| १० | १९८७-८८ | १३६१ | २११४ | ३४७५ | १ | ४ | ३ | १ | ३४८४ |

संदर्भ -- वारणा बझारचे वार्षिक अहवाल ( १९७८-७९ ते १९८७-८८ )

वरील आकडेवारी वरुन असे दिसून येते की सभासद संख्येमध्ये विशेषत: व्यक्ती सभासद संख्येमध्ये १९७८ पासून १९८७ पर्यन्त सभासद संख्या सातत्याने वाढत आहे. १९८६-८७ या अहवाल सालात एकून ७३ नवीन सभासद झाले,असून या पैकी फक्त १२ सभासद पुरुष असून इतर सर्व स्त्रिया आहेत. ३०-६-८७ अखेर एकून व्यक्ती सभासद संख्या ३४०७ झाली असून त्यामध्ये स्त्री सभासदांचे प्रमाण ६० टक्के आहे. १९८७-८८ मध्ये व्यक्ती सभासद ३४७५ इतके वाढले. नवीन सभासद ६८ वाढले त्यातील पुरुष ४ व स्त्रिया ६४ आहेत. तसेच इतर संस्था व सहकारी संस्था मिळून ३४८४ इतके सभासद संख्या वारणा बझारची आहे. इतर संस्था व सहकारी संस्थेमध्ये बदल झालेला नाही.

वारणा बझारच्या सभासद संख्येच्या वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की या वारणा बझारमध्ये स्त्रियांचा वाढता भाग पुरुषांच्या तुलनेने जास्त आहे. स्त्रियांना सभासदाच्यामध्ये फार महत्व देण्यात आले आहे. तसेच सध्या वारणा बझारच्या चेअरमनपदी स्त्रियांना स्थान देण्यात आले आहे. यावरुन वारणा बझारचा उद्देश असा आहे की ग्राहक सहकारी चळवळीमध्ये स्त्रियांचा वाढता भाग सहभागी होण्यासाठी त्यांना उच्च पदांची वगैरे सवलती देऊन स्त्रियांना ग्राहक सहकारी भांडारामध्ये वाढता सहभाग करुन घ्यावयाचा आहे. परिणामी ग्राहक सहकारी चळवळ लोकांच्या मनावर चांगली रुजविण्यासाठी त्याना जास्त स्थान दिले आहे. आजही मोठ्या प्रमाणात वारणा बझारच्या सभासदत्वामध्ये स्त्रियांचा जास्त सहभागी भाग दिसून येतो.

अशा त-हेने वारणा बझारची वाढती सभासद संख्या पुढील आलेखाव्दारे दर्शविली आहे.




संदर्भ - वारणा बझारचे वार्षिक अहवाल १९७८-७९ ते १९८७-८८.

## ३:२ वारणा बझारचे भाग मांडवल --

तक्ता क्रमांक ३.२

वारणा बझारचे २ एप्रिल १९७८ ते १९८८ अखेरचे भागमांडवल खालीलप्रमाणे :--

| वर्ष | व्यक्ती सभासद | सह.संस्था सा.कारखाना | इतर सह. संस्था | इतर संस्था | सरकारी भागमांडवल |
|---|---|---|---|---|---|
| २ एप्रिल | | | | | |
| १. १९७८ | ११०३७५ | १००००० | १३.००० | ३.००० | ४००००० |
| २. १९७९-८० | १२६१२५ | ,, | ,, | ,, | ,, |
| ३. १९८०-८१ | १८६१२५ | ,, | ,, | ,, | ,, |
| ४. १९८१-८२ | २४४७५० | ,, | ,, | ,, | ,, |
| ५. १९८२-८३ | ६२२६७५ | ,, | ,, | ,, | |
| ६. १९८३-८४ | ७०६९०० | ,, | ,, | ,, | ६५०००० |
| ७. १९८४-८५ | ७८२२२५ | ,, | ,, | ,, | ९००००० |
| ८. १९८५-८६ | ९३०२५० | ,, | ,, | ,, | ११३०००० |
| ९. १९८६-८७ | ९८०३७५ | ,, | ,, | ,, | १०९००० |
| १०. १९८७-८८ | १०१८७७५ | ,, | १४.००० | ,, | १०५०००० |

संदर्भ : वारणा बझारचे वार्षिक अहवाल ( १९७८-७९ ते १९८७-८८ )

२ एप्रिल १९७८ रोजी वारणा बझार सुरु झाले त्यावेळी मिळालेली

सरकारी आर्थिक मदत रुपये ४,००,००० लाख इतकी आहे व व्यक्तीगत सभासद मांडवल ११०३७५ रुपये आहे. सहकारी संस्था,साखर कारखाना १,००,००० लाख रुपये इतके मांडवल आहे व इतर सहकारी संस्था मिळून १३,००० इतके मांडवल आहे. इतर संस्था ३,००० इतके भाग भांडवल आहे.

वरील आकडेवारी वरुन असे दिसून येते की सहकारी संस्था व इतर संस्थाच्या भाग भांडवलामध्ये १९७८ पासून १९८६-८७ अखेर वाढ झालेली नाही. परंतु व्यक्तीगत भागभांडवलामध्ये १,१०,३७५ रुपये पासून १९८६-८७ अखेर ९,८०,३७५ रुपये वाढ झाल्याचे दिसून येते. तसेच सरकारी भागभांडवलामध्ये १९८३-८४ पासून वाढ होत आहे. एकूण सरकारी भागभांडवलामध्ये ६ पट वाढ झाली आहे. म्हणजेच १९८६-८७ अखेर १०,९०,००० रुपये इतके भाग भांडवलात वाढ झाली आहे.


१९८५-८६ मध्ये एकूण भाग भांडवल रुपये २१,७६,२५० होते त्यामध्ये व्यक्ती सभासदांचे रुपये ५०,१२५ वाढ झाले. शासनाकडून मिळालेले भाग भांडवल मुदती प्रमाणे परत करण्याचे सुरु असून अहवाल सालात रुपये ४०,०००- शासनाचे भाग भांडवल परत करण्यात आले.

संस्थेचा व्याप वाढत असल्याने त्यांना कर्जे व सभासदाकडून ठेवी घेऊन भाग भांडवलात वाढ करावी लागते.

कर्जे दिवसेंदिवस संस्थेचा व्याप वाढत असल्याने श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर यांचेकडून मिळालेले हायपॉथिकेशन कॅश क्रेडिट कर्ज रु.३०- लाखावरुन रुपये ३५ लाखापर्यन्त वाढवून मागण्यात आले आहे.

सभासदाकडून ठेवी --

संस्थेचा व्याप दिवसेंदिवस वाढत असल्याने खेळत्या मांडवलासाठी सभासदांकडून मेंबर ठेवी स्वीकारण्यात येत आहेत. एक वर्ष मुदतीने ठेव ठेवणाऱ्या सभासदाला १२ टक्के प्रमाणे व्याज दिले जाते अशा तऱ्हेने संस्था जादा लागणारे मांडवल निर्माण करते.




संदर्भ - वारणा बझारचे वार्षिक अहवाल १९७८-७९ ते
१९८७-८८.

वाढते माग मांडवल पुढील आलेखा व्दारे दर्शविले आहे.

## ३:३ वारणा बझारची विक्री --

वारणा बझार संस्थेची १९७९-८० च्या वर्षापासून ३०-६-१९८८ अखेरची प्रगती खालील आकडेवारीवरुन दिसून येईल :--

तक्ता क्रमांक ३:३:

वारणाबझारची विक्री

| विक्री वर्ष | एकूण विक्री | निव्वळ नफा |
|---|---|---|
| १. १९७९-८० | १,४७,३७,२३० | ४०.८२८ |
| २. १९८०-८१ | १,६३,१४,७९२ | ५५.५०९ |
| ३. १९८१-८२ | २,३०,६१,६२८ | ६८.२९० |
| ४. १९८२-८३ | ३,०७,८३,१८३ | ७१.४०९ |
| ५. १९८३-८४ | ३,७२,५०,१९६ | ७३.३५४ |
| ६. १९८४-८५ | ४,७०,७४,९०२ | ५८.१९४ |
| ७. १९८५-८६ | ५,२१,९१,४६० | ६९.५८२ |
| ८. १९८६-८७ | ६,८८,३७,२८३ | ८२,६४३ |
| ९. १९८७-८८ | ७,८६,४३,९४१ | ९०.५९३ |

संदर्भ : वारणाबझारचे वार्षिक अहवाल (१९७८-७९ ते १९८७-८८ )

वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की १९७९-८० साली वारणा बझारला ४०.८२८ इतका निव्वळ नफा झालेला आहे, तो सातत्याने १९८६-८७ पर्यन्त वाढलेला दिसतो. संस्थेच्या १९८६-८७ या वर्षात एकूण खरेदी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

रुपये ६,६०,२६,२५७-०० ची झाली असून विक्री रु.६,८८,३७,२८३ झाली आहे. एकूण उत्पन्न रु.३३,७२,९५९- होऊन त्यातून सर्व प्रकारचा खर्च व कायदेशीर तरतुदी मिळून रु.३२,८९,५०८-० वजा जाता संस्थेस निव्वळ नफा रु.८२,६४२-८७ इतका झालेला आहे. १९८७-८८ विक्री उद्दिष्ट ७.६२ कोटीचे होते. प्रत्यक्षात एकूण विक्री रु.७.८६ कोटी झाली .अहवाल सालात संस्थेकडे एकूण खरेदी रु.७,४३,६७,८३३-० ची झाली असून विक्री रु.७,८६,४३,९४१-० ची झाली आहे. एकूण उत्पन्न रु.४१,४८,०६१-० होऊन त्यातून सर्व प्रकारचा खर्च व कायदेशीर तरतूदी मिळून रु.४०,५७,४६८-० वजा जाता संस्थेस निव्वळ नफा रु.९०,५९२-६५ इतका झाला आहे.

संचालक मंडळाने खालीलप्रमाणे नफा विभागणी करण्याची शिफारस करुन ती आपल्या मंजूरीकरिता ठेवली आहे.

| | |
|---|---|
| | एकूण नफा रु.९०,५९२-६५ |
| १. रिझर्व फंड २५ टक्के रुपये | २२,६४८-१५ |
| २. सहकार प्रचार धर्मादाय फंड १० टक्के | ९,०५९-२५ |
| ३. किंमत चढउतार फंड १५ टक्के | १३,५८८-९० |
| ४. इमारत फंड | ४५,२९६-३५ |
| रुपये | ९०,५९२-६५ |

वारणा बझारची सुरुवातीपासूनची उद्दिष्ठांपेक्षा प्रत्यक्ष विक्री जास्त होते. पाच कोटीपेक्षा जास्त वार्षिक विक्री होणाऱ्या देशात एकूण २५। ३० ग्राहक सहकारी संस्था असून त्यामध्ये आता वारणा बझारचा समावेश झाला आहे.

तसेच ग्रामीण विभाग हेच आपले कार्यक्षेत्र स्वीकारुन इतक्या अल्पावधित पाच कोटीपेक्षा जास्त वार्षिक विक्री होऊन वारणा बझारने ग्राहक सहकारी चळवळीमध्ये क्रांती केली आहे.

वारणानगरची रोजची विक्री दीड लाखांच्यावर आहे. वडगांवची विक्री ३५ हजाराहून अधिक आहे, तर इतर छोटया शाखांची विक्री सरासरी पाच ते आठ हजार रुपये आहे. आज खेड्यातल्या कोणत्याही व्यापाऱ्याची विक्री एवढी होत नसते एवढा प्रतिसाद मिळत आहे.

वारणा बझारची एकूण विक्री व शाखांची विक्री जसजशी वाढत जाईल त्या प्रमाणे पुढील आलेखाव्दारे दर्शविली आहे.

३:४ <u>वारणा बझारचा शाखा विस्तार</u> --

वारणा बझारचे नांव व किर्ति एकूण परिसरात दिवसेंदिवस वाढतच आहे. वारणा बझारच्या कार्यक्षेत्रात एकूण ६० खेडी येतात. काही वारणा बझार पासून जवळ जवळ १५-१६ मैल दूर आणि आडवळणी ठिकाणी असल्याने त्याची सेवा योग्य प्रकारे होत नाही.

म्हणून वारणा बझारची शाखा आपल्या गांवी सुरु व्हावी म्हणून कार्य क्षेत्रातील बऱ्याच गांवातून उत्स्फूर्तपणे मागणी येवू लागली आहे. किणी व मांगले येथे छोटया शाखा व वडगांव येथे डिपार्टमेन्ट स्टोअर्स सुरु केले. वाळवा तालुक्यातील बाहादूरवाडी येथील यात्रे निमित्त प्रथम स्टॉक सुरु केला. स्टॉलला उत्तम प्रतिसाद मिळाल्याने मार्च ते जून हे चार महिने तेथे हा स्टॉल चालवून १ जुलै १९८६ पासून रितसर शाखा सुरु केली.

सातवे येथील ग्रामस्थानी देखील शाखेसाठी मागणी करुन सोसायटीची जागा देऊ केली त्या प्रमाणे १२ मे १९८६ रोजी शाखा सुरु केली. विक्री चांगली आहे. सर्व शाखात सातवे शाखेची इमारत आऊटलेटसाठी ( विक्रीसाठी ) सुयोग्य अशी आहे. तसेच ऐतवडे खुर्द व चिकुर्डे या दोन शाखा नवीन सुरु करण्यात आल्या असून कोडोली, सागाव व येलूर या तीन शाखा नवीन चालू झाल्या आहेत.

यावरुन वारणा बझारच्या शाखांसाठी मागणी वाढती आहे ,यातच वारणा बझारचे महत्व लोकांना पटल्याचे दिसून येते. म्हणून लवकरच निरनिराळ्या

ठिकाणी ११ शाखा उघडण्याच्यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत.

वारणा बझारच्या शाखांची अहवाल सालात १९८६-८७ या वर्षात झालेली प्रगती खालील आकडेवारी वरुन दिसून येईल. १९८६-८७ या वर्षी विक्री उद्दिष्ट रु.५९८ कोटीचे होते पण प्रत्यक्षात विक्री ६.८८ कोटी झाली.

तक्ता क्रमांक ३.४

वारणा बझारच्या शाखांची सरासरी विक्री


| वारणा बझार शाखा | स्थापना | खरेदी | विक्री | सरासरी विक्री | व्यापारी नफा |
|---|---|---|---|---|---|
| १.वारणानगर | २-४-१९७८ | ४,८८,६९,७५४ | ५०,८५८०३६ | १,६५,६६१ | २३,६५,३३२ |
| २.किणी | १०-११-१९८२ | १६,९६,८५५ | १७,५९,२७४ | ५,७३१ | ६९,३०८ |
| ३.मांगले | १६-१-१९८३ | २३,३७,०५९ | २३,८०,८७९ | ७,७५५ | ६८,७०० |
| ४.वडगांव | २-४-१९८४ | ९३,४९,८२० | १,०१,९५,४८३ | ३३,२१० | ६,८४ ,७६६ |
| ५.सातवे | १२-५-१९८६ | १८,५४,१३१ | १८,७८,११६ | ६,११८ | ६३,५०५ |
| ६.बहादुरवाडी | १-६-१९८६ | १२,२२,८४७ | १२,०८,७५६ | ३,९३७ | ५३,११३ |
| ७.ऐतवडे खुर्द | १४-४-१९८८ | ३,१८,९११ | २,६९,१८२ | ४,१४१ | १२,४३५ |
| ८.चिकुर्डे | १२-५-१९८७ | ३,७६,८८० | २,८७,५०७ | ६,८४५ | १३,९२० |
| ९. कोडोली | २८-१ ते ३०-६-८८ | १०,३७,०९७ | ९,९५,३६६ | ७,५४० | ४१,६५७ |
| १०. येलूर | १८-३ ते ३०-६-८८ | ४,१७,८०८ | ३,६८,७५७ | ४,१४३ | १६,३३० |
| एकूण | | ६,६०,२६,२५७ | ६,८८,३७,२८३ | २३३.३९८ | ३३,३१,०७९ |

संदर्भ -- वारणा बझारचे वार्षिक अहवाल ( १९७८-७९ ते १९८७-८८ )

वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, वारणानगर मधील वारणा बझारचे वार्षिक विक्रीमधून होणारा व्यापारी नफा २३,६५,३३२ रुपये आहे. त्यानंतर वारणा बझारच्या शाखेमध्ये असणारे वडगांव बझार ग्राहक भांडाराचा दुसरा क्रमांक लागतो. या भांडाराचे वार्षिक विक्रीमधून होणारा व्यापारी नफा रु.६,८४,७६६ आहे. या नंतर किणी, मांगले, सातवे व बहादुरवाडी मधील ग्राहक भांडाराचे वार्षिक विक्रीमधून होणारा व्यापारी नफा सरासरी ५० ते ५८ हजारापर्यन्त होत गेलेला दिसतो. तसेच ऐतवडे खुर्द - चिकुर्डे ची शाखा नवीन असल्याने त्याचा वार्षिक विक्रीमधून होणारा व्यापारी नफा सरासरी १२ ते १४ हजार रुपयापर्यन्त झालेला दिसतो.

अशाप्रकारे वारणा बझारच्या शाखेची वार्षिक अहवालावरुन झालेली प्रगती दिसून येते.

..




संदर्भ - वारणा बझारचे वार्षिक अहवाल
१९७८-७९ ते १९८७-८८.